जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 8 FEB 2024
तरुण भारत

# विद्यापीठात २१ रोजी निसर्गोपचार विषयावर मार्गदर्शन

कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने २१ ते २२ फेब्रुवारी दोन दिवस राष्ट्रीय योग व निसर्गोपचार परिषदेचे आयोजन केले आहे. मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात हे शिबिर होईल. "योग व निसर्गोपचाराचे नवे आयाम' असा आहे. यामध्ये योग, निसर्गोपचार, ऑक्यूप्रेशर, आहार, अशा विविध विषयावरील शोधनिबंध सादर होणार आहेत. तरी २० फेब्रुवारी पर्यंत परिषदेसाठी नावनोंदणी करावी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2024
पुढारी

# विद्यापीठाच्या ६३५ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तरच्या ६३५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. शनिवारी मास्टर ऑफ फार्मसी अभ्यासक्रमाची परीक्षा झाली. दि. १६ रोजी मास्टर ऑफ आर्किटेक्चरच्या विविध सत्रांचे निकाल जाहीर झाले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव यांनी दिली.